# ...अखेर बडतर्फ असलेल्या रणजित कासलेंचा पापाचा घडा भरला; जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी दिला मोठा दणका..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## सायबर क्राईमने शोध घ्यावा शिवसेनेची मागणी


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २५२ ■ शनिवार दि.३१ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 252 ■ Saturday Dt.31 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# बीड जिल्ह्याला शिंदेंच्या शिवसेनेला मिळाला खंबीर जिल्हाप्रमुख; स्वप्निल गलधर यांनी केला कासलेंच्या विरोधात गुन्हा दाखल

## बडतर्फ पोलीस अधिकारी रणजित कासले डोक्यावर पडल्यासारखं काही पण बोलू लागला; एकदा टायरमध्ये घालून चांगलं सोलून काढा?

## मंत्री संजय शिरसाट व शिवसेनेची बदनामी करणाऱ्यांना एकदा कायद्यात हिसका दाखवायला हवा?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह सरकारवर टीका करणारे बडतर्फ पोलिस अधिकारी रणजित कासले यांच्या विरोधात आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. सामाजिक शांतता भंग करण्याच्या प्रयत्नासह मंत्री संजय शिरसाट यांची बदनामी केल्याचा आरोपात हा गुन्हा दाखल झाला आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्या तक्रारीवरून सदरील गुन्हा दाखल झालेला आहे.

जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर हे दि.३० मे रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात असताना दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर इंस्टाग्राम खाते पाहत असतावेळी सोशल मीडियावर बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत रेडी या नावाच्या इंस्टाग्राम खात्यावरून महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट तसेच







शिवसेना यांचे नाव घेऊन संजय शिरसाट, आयपीएस अधिकारी निखिल गुप्ता व मुकेश नाटा बिल्डर्स यांची किती वर्कर काम करतात. यांचे ब्लॅक चे व्हाईट, व्हाईट चे ब्लॅक करण्याची व्यवसाय आहेत. असे बोलून व्हिडिओ मोबाईल रेकॉर्डिंग दाखवतांचा व्हिडीओ त्यामध्ये एका गुजरातच्या यूट्यूब चैनल चालविणारा महाराज यांच्याशी संवाद करताना संजय शिरसाट यांच्या नावाने स्विस बँकेत ८० ते ९० करोड रुपये टाकण्याच्या मागणीचे संभाषणाचे विविध रेकॉर्डिंग सोशल मीडियावर बडतर्फ अधिकारी रणजीत रेडी या इंस्टाग्राम खात्यावरून चुकीच्या व बदनामी करण्याच्या हेतूने खोटे आवाज तसेच पद सांगून पैशाची मागणी करून महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना पक्षाचे बीड जिल्ह्याची संपर्क मंत्री यांची खोटी व दिशाभूल करणारी माहिती सोशल मीडियावर प्रसारित करून संजय शिरसाट यांची व शिवसेना पक्षाची बदनामी केली आहे. याबाबत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी इंस्टाग्राम वरील अकाउंट पीएसआय रणजित रेडी या खाते धारका विरुद्ध कायदेशीर फिर्याद देऊन गुन्हा दाखल केला आहे. तसेच पोलीस प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन कायदेशीर पुढील कारवाई करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी केली आहे तसेच सायबर क्राईमला एफआर रजिस्टर केला आहे.

बडतर्फ पोलीस अधिकारी असलेल्या रणजीत कासलेंचा पापाचा धडा भरलाय शेवटी त्यांना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी मोठा दणका दिला आहे. मंत्री संजय शिरसाट व शिवसेनेचे बदनामी करणाऱ्यांना एकदा कायद्याचा हिसका दाखवणं गरजेचं आहे असं सांगितलं जात आहे. सेवेतून बडतर्फ असणारा पोलीस अधिकारी रणजीत कासले हा डोक्यावर पडल्यासारखं काही पण बोलू लागला आहे. यामुळे तातडीने सायबर क्राईमने त्याचा शोध घ्यावा आणि कायदेशीर पुढील कारवाई करावी अशी, शिवसेनेची मागणी आहे.

## बीड शहरातील मुख्य रस्त्यावर नगरपालिकेच्या वतीने वृक्ष लागवड करावी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मुख्य रस्त्यावर बीड नगरपालिकेने वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण वाढवावे जेणेकरून भविष्यामध्ये पाऊस शहरांमध्ये चांगला पडेल आणि शहरांमध्ये कुठेही पाण्याची कमतरता भासणार नाही आणि वृक्ष लावल्यानंतर वृक्षाचे संगोपन देखील ज्या ज्या ठिकाणी वृक्ष नगरपालिकेच्या वतीने लावण्यात येतील त्या त्या ठिकाणच्या नागरिकाने त्या वृक्षाची दक्षता घ्यावी व त्याचे रक्षण करावे व बीड जिल्ह्यातील मानवतेचा एक आगळावेगळा संदेश



इतर महाराष्ट्रातील शहरांना देखील घेण्यासारखा वाटेल असे कार्य करावे बीड नगर परिषदेच्या वतीने वृक्ष लागवड करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे म्हटले आहे.

महाराष्ट्र शासन देखील सांगत आहे की झाडे लावा झाडे जगवा आणि संत देखील सांगतात की वृक्षवल्ली आम्हा सोयरे ही वनचरे या न्यायाप्रमाणे बीड नगर परिषदेच्या वतीने बीड शहरातील मुख्य रस्त्यावर वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण राखण्यासाठी नक्कीच मदत होईल आणि बीड शहराचे या वृक्षाने अतिशय सुशोभीतीकरण झाल्यासारखे दिसेल.

## लग्नातील हुंडा द्यायला सांग असे धमकावून विवाहितेच्या डोक्यात कोयत्याचा वार

### दिंद्रुड ठाण्यात पती विरुद्ध गुन्हा दाखल

दिंद्रूड । प्रतिनिधी

लग्नामध्ये मला तुझ्या वडिलांनी हुंडा दिला नाही हुंड्याचे पन्नास हजार रुपये घेऊन ये, असे धमकावून डोक्यात कोयत्याचा वार करत जिवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार दिंद्रुड हद्दीत घडला असून, विवाहित महिलेचा शारिरीक व मानसिक छळ केल्याप्रकरणी दिंद्रुड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सविता रमेश चव्हाण या विवाहित महिलेस, तिचा पती रमेश नारायण चव्हाण रा. माळतांडा तहत मोगरा (ता. माजलगाव) याने सविता हिस म्हणाला की, तुझ्या वडिलांनी मला लग्नात हुंडा दिला नाही त्यामुळे हुंड्याचे पन्नास हजार रुपये तुझ्या वडिलाकडून आणून दे असे धमकावले. विवाहितेने वडिलांची परिस्थिती गरीब असल्याने ते देऊ शकत नसल्याचे सांगितले मात्र रमेश याने नाहीतर तु माझ्या पहिल्या पत्नीला आणायला चल असे म्हणत शिवीगाळ करून डोक्यात कोयत्याचा वार केला

▶ पान २ वर




## बिंदुसरा धरणात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या धोक्याविषयी तातडीने उपाययोजना करावी : जगताप

बीड । प्रतिनिधी

मागील काही महिन्यांतील अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण ओसंडून वाहत आहे. त्यामुळे बीड शहरासह परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांचे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी आणि नगर परिषद बीडचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या निवेदनामध्ये धरण परिसरात प्रवेशबंदी करावी, धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजनबद्ध नियमन करावे, नागरिकांना पूर्वसूचना देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, संभाव्य पूरग्रस्त भागात जिल्हा प्रशासनाने वेळेवर माहिती द्यावी, ग्रामीण भागात मदत व बचाव कार्यासाठी यंत्रणा तत्पर ठेवावी अशी मागणी करण्यात आली आहे.

सध्याची परिस्थिती पाहता भविष्यात मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कृती करावी, असेही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

# चला, प्लास्टिकमुक्ती करू या ; एकल प्लास्टिक वापरबंदी व प्रदूषणाबाबत ना. पंकजाताई मुंडेंची पुण्यात जनजागृती मोहीम

# इतर भेटवस्तू देण्यापेक्षा कापडी बॅगाच द्या : कार्यकर्त्यांना केले आवाहन

पुणे । प्रतिनिधी

पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी राज्यात सध्या नो प्लास्टिक मोहीम सुरू केली असून त्याचाच एक भाग म्हणून पुण्यात आज त्यांनी 'एकल प्लास्टिक वापरबंदी व प्रदूषणाबाबत जनजागृती मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी त्यांच्या हस्ते कापडी पिशवी वाटप मशीन'चेही उद्घाटन करण्यात आले. कोणत्याही कार्यक्रम अथवा प्रसंगात मला अन्य काही गिफ्ट देण्यापेक्षा कापडी बॅगा गिफ्ट करा, म्हणजे इतरांना त्याचा उपयोग होईल असे सांगत चला प्लास्टिकमुक्ती करुयाचे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.



पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित 'एकल प्लास्टिक वापरबंदी व प्रदूषणाबाबत जनजागृती मोहीम' आज नूतन मराठी विद्यालय, पुणे येथे यशस्वीरीत्या पार पडली. या मोहिमेचा उद्देश रोजच्या जीवनात प्लास्टिकचा वापर न करता त्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने जबाबदारीची जाणीव करून देणे हा आहे. या कार्यक्रमापूर्वी प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर परिसरात 'कापडी पिशवी वाटप मशीन'चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कसबा पेठचे आ.हेमंत रासने यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्था, अनेक पर्यावरण प्रेमी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कापडी पिशव्या गिफ्ट करा

याप्रसंगी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, एकल प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारून आपण जागतिक स्तरावर बदल घडवून आणू शकतो. प्लास्टिकमुळे होणारे आरोग्याच्या समस्या कमी होतात. प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण कमी होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश हा नागरिकांना प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक कापडी पिशव्या वापरण्यास प्रोत्साहन देणे हा आहे. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक स्वरूपात जनतेपर्यंत पोहोचवणे हा आहे. प्लास्टिक पिशव्या वापरण्याऐवजी, पुनर्वापर करता येतील अशा कापडी पिशव्या वापरणे याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न आहे. सर्वांनी हा दृढ संकल्प करुन एकल प्लास्टिकबंदीसाठी सहयोग दिला पाहिजे. यापुढे मला इतर कुठल्याही भेटवस्तू देण्यापेक्षा कपडयांच्या बॅग गिफ्ट द्या म्हणजे त्या मी इतरांना वापरायला देऊ शकेल जेणेकरून प्लास्टिक मुक्त मोहिमेला चालना मिळेल असे सांगत चला प्लास्टिकमुक्ती करु या असे आवाहन ना.पंकजाताई मुंडे यांनी केले.

## पशुवैद्यकीय दवाखाना स्वच्छता, शेळ्या मेंढ्याचे लसीकरण, मेंढपाळांना मार्गदर्शनासह विविध उपक्रम राबवले जाणार

मुंबई । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य, विचार आणि प्रेरणादायी जीवनगाथा जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती दिनाचे औचित्य साधून दि.३१ मे २०२५ रोजी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी, कर्तबगार व दूरदृष्टी असणाऱ्या स्त्रीशक्तीचे प्रतिक आहेत. त्यांनी धार्मिक सहिष्णुता, समाजकल्याण, सार्वजनिक बांधकाम, न्यायप्रविष्ठ प्रशासन आणि स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श राज्यकारभाराची उभारणी केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य समाजसेवा, धर्मनिष्ठा आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक असून, ते महाराष्ट्र राज्याच्या प्रगत व उन्नत वाटचालीसाठी नेहमीच पथदर्शी ठरले आहे. यास अनुसरुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत अधिनस्त संस्थांमध्ये कार्यालय/ दवाखाना परिसर स्वच्छता व सुशोभिकरण करणे, गाव पातळीवर वंधत्व / सर्वोपचार शिबिरांचे आयोजन करणे, फिरस्ती मेंढपाळांची भेट घेऊन त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, मेंढपाळांच्या शेळ्या-मेंढ्यांचे मान्सून पूर्व लसीकरण करणे, पशुधनाचे जंतनिर्मूलन, गोचीड निर्मूलन, करडे / कोकरे मरतूक कमी करणेबाबत उपाययोजना करणे, मेंढपाळांसाठी तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिर / परिसंवादाचे आयोजन करणे, वृक्ष लागवड करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत, अशा सूचना मंत्री श्रीमती मुंडे यांनी दिल्या आहेत.

पशुसंवर्धन आयुक्त रामस्वामी एन आणि पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त विभागाच्या मुख्यालयातही अभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या या उपक्रमांमुळे मेंढी-शेळी पालकांशी थेट संवाद साधता येऊन शासनाचे विविध उपक्रम, योजना तसेच शेळी-मेंढी तांत्रिक व्यवस्थापनाविषयी माहिती पशुपालकांना देणे शक्य होईल. तसेच शेळी-मेंढीपालनाला आधुनिक व्यवसाय व्यवस्थापनाच्या माध्यमातून अधिक किफायतशीर करण्यासाठी विभागाला आवश्यक धोरणांची निर्मिती व अंमलबजावणी करणे सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त करत पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी निर्देश दिले आहेत.

## आचार्य टाकळी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



सिरसाळा । प्रतिनिधी

दिनांक ३१ मे २०२५ रोजी मौजे आचार्य टाकळी येथे अहिल्यादेवी होळकर यांची त्रीशताब्दी जयंती साजरी करण्यात आली. ज्या मनगटात बळ बुध्दी आणी चातुर्य आहे तोच खरा स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनु शकतो. माहाराणी पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर. पदव्या पुण्यश्लोक राजमाता धर्म रक्षक जन्म ३१ मे १७२५ रोजी नगर जिल्ह्यात चौडी या ठिकाणी त्याचा जन्म झाला आहे.

प्रजाहिताची शिकवण देणाऱ्या धर्म आणि प्रशासक विचार परिवर्तक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना ३०० व्या वी जयंतीदिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित गावचे प्रमुख पाहुणे व मान्यवर उपस्थित होते.

सरपंच रामभाऊ तात्या घोडके, मोहन आबा आचार्य उपसरपंच बबन जिजा आचार्य, चेरमन तुकाराम आचार्य, मा. सरपंच सतीश काका आचार्य, माजी सरपंच संतोष आचार्य एम.डी. काळे, कमलाकर काकडे, दिगंबर बाप्पा काकडे, किशोर काकडे, प्रदीप काकडे, रामभाऊ काकडे, किशोर काकडे, दत्ता काकडे, यावेळी जय मल्हार ग्रुप व आचार्य टाकळी येथील गावकरी मंडळी उपस्थित होते.

# अशोक रसाळ यांच्या बालाघाट मंडळामध्ये अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

मांजरसुंबा । प्रतिनिधी

३० मे रोजी बीड बालाघाट मंडळ आयोजित मंडळाध्यक्ष अशोक रसाळ यांनी स्वच्छता मोहीम अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन व शिवमंदिर येथे आरती करून अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती उत्साहात साजरी केली, अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राजकीय जीवनात अनेक मंदिराचा जिर्णोद्धार केला शिव मंदिरे उभारली त्यांचे पुन: निर्माण केले अनेक शिव मंदिरांचा जीर्णोद्धार केला हे योगदान कधीही न विसरण्यासारखे आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या स्त्रीशताब्दी जन्मोत्सवानिमित्त बालाघाट मंडळातर्फे निसर्गाच्या सानिध्यात असलेले श्री क्षेत्र कपिलधार येथे मन्मथ स्वामी यांच्या समाधीने पवित्र असलेले अनेक राज्यांमध्ये या देवस्थानचे नावलौकिक आहे. आज येथेच भारतीय जनता पार्टी तर्फे स्वच्छता मोहीम शिव आरती व



अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यानिमित्त यावेळी कार्यक्रमास प्रमुख उपस्थित म्हणून भाजप जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख भाजप संघटन सरचिटणीस नागरगोजे सर हे उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजक बालाघाट मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ यांनी कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले होते. यावेळी देवस्थानचे पुजारी डॉ. प्रशांत स्वामी, भाजपा अनुसूचित मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर, अल्पसंख्यांक मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष सलीम जहागिरदार, युवा नेते आप्पासाहेब झोडगे, चौसाळा सर्कल प्रमुख बप्पासाहेब हावळे, विनोदराव काळासे, उदंड वडगाव ग्रा. प.सदस्य नवनाथ चव्हाण, तांदळवाडी चे बुथ प्रमुख नामदेव आबा खोसे, मांजरसुंबा प्रमुख दत्ता रसाळ, पवन कोकाटे, तुषार लाड, अनुरथ कोकाटे, ओमकार रसाळ, दत्ता वाघेरे गणेश, वाघिरे दीपक, वाघिरे ओंकार रसाळ, पवन रसाळ, रितेश सुरवसे, गणेश थोरबोले, वसंत रसाळ, व इतर अनेक जण या कार्यक्रमात सहभागी झाले व उत्साहाने मंदिरामध्ये स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करून शिव मंदिरात महाआरती करण्यात आली.

यावेळी आयोजक मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले बालाघाटावरील यावेळी अनेक तरुण व ज्येष्ठ सहभागी झाले होते.



बीड - पुण्यश्लोक, राजमाता अहिल्यादेवी होळकरांच्या त्रीशताब्दी जयंती निमित्त विनम्र अभिवादन करतांना फहीम इनामदार, गणेश भेटे, पोलीस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रवींद्र शिनगारे.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या हस्ते बिंदुसरा धरणात जलपूजन

## बिंदुसरा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने पूर्ण भरला

बीड । प्रतिनिधी

बीडतालुक्यातील पाली येथे असलेला बिंदुसरा धरण प्रकल्प मान्सुनपूर्व पावसानेच १०० टक्के क्षमतेने भरला असून आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३०) रोजी बिंदुसरा धरणात जलपूजन करण्यात आले.

मागील काही दिवसांपासून होत असलेल्या सततच्या मान्सूनपूर्व पावसाने बीड शहराला लागून असलेल्या पाली येथील बिंदुसरा धरणात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले असून पाणी ओसंडून वाहत आहे. पावसाळ्यापूर्वीच धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने नागरिक आणि



शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. परंतु यासोबतच नदीकाठच्या नागरिकांनी पूरपरिस्थिती संदर्भात सतर्क राहून खबरदारी घेण्याचेही आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान आ.क्षीरसागर यांनी बिंदुसरा धरणाची सुरक्षेच्या दृष्टीने पाहणी केली. यावेळी महसूल विभाग, जलसंपदा विभाग, जायकवाडी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## बुलंद छावाचा समाज रत्न पुरस्कार, व्याख्यान व गुणगौरव सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त यावर्षीचा बुलंद छावाचा समाज रत्न पुरस्कार,व्याख्यान, मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष दहावे गुरुवार दि. २९ मे २०२५ रोजी सकाळी ११ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे बुलंद छावा मराठा युवा परिषद बीड आयोजित स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त इयत्ता दहावी व इयत्ता बारावी मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा प्रमुख मान्यवर ज्येष्ठ नेते विलास बडगे, शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे,शिवसंग्रामचे नेते अनिल घुमरे,शिक्षक संघटनेचे नेते श्रीराम बहीर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला व शिवचरित्रकार श्री ज्ञानदेव काशीद यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते दरवर्षी समाजातील आदर्श व्यक्तीचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो यावर्षीचा पुरस्कार साम टीव्ही चे बीड जिल्हा प्रतिनिधी श्री योगेश काशीद, अड. शशिकांत सावंत, श्री प्रशांत मस्के सर यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन बुलंद छावाचे बीड जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर यांनी केले बुलंद छावाचे पदाधिकारी नारायण गवते, आजिनाथ आदमाने, जीवन धांडे, पांडुरंग गवते, विजय पवार यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास अड. विनायकराव जाधव,राष्ट्रीय छावा जिल्हाध्यक्ष युवराज मस्के, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश मस्के, कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत बागलाने, मराठा सेवक संजय गोडसे, संतोष डोंगरे महाराज, सुरेश ढास, गोविंद वायकर, भागवत मस्के,कल्याण भवर, खुरणे मॅडम यांच्यासह विद्यार्थी, पालक व शंभू प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनंजय मुंडेंच्या प्रयत्नांना यश; धर्मापुरी किल्ला संवर्धनासाठी ३ कोटी ३९ लाख

मुंबई । प्रतिनिधी


माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून आज पर्यटन विभागाकडून परळी मतदारसंघातील प्रसिद्ध धर्मापुरी किल्ल्याच्या संवर्धन व जतन कामासाठी तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्चनास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी धर्मपुरी किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी एकूण नऊ कोटी रुपयांची मागणी केली होती त्यापैकी साधारण तीन कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी खर्च शासन निर्णयाद्वारे आज मान्यता देण्यात आले आहे.

त्याचबरोबर अंबाजोगाई शहरालगत असलेल्या पुरातत्व विभागांनी विशेष भाग म्हणून घोषित केलेल्या सकलेश्वर मंदिर अर्थात बाराखडी नावाने प्रसिद्ध असलेल्या स्थळाच्या विकासासाठी सुमारे ३५ लाख रुपये, तसेच सुप्रसिद्ध खोलेश्वर मंदिर परिसराच्या विकासासाठी सुमारे ४५ लाख रुपये निधी करतात शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये धनंजय मुंडे यांनी धर्मापुरी किल्ल्यासह बारा खांबी मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या परिसराच्या विकासासाठी निधी देण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना विनंती केली होती.

धर्मपुरी येथील भुईकोट किल्ला हा सुप्रसिद्ध असून पर्यटनाच्या दृष्टीने तो अत्यंत उपयुक्त आहे. मात्र मागील अनेक वर्षांपासून नागरी सुविधांमुळे तो वंचित राहिलेला आहे. या किल्ल्याच्या संवर्धनासह येतील ऐतिहासिक ठेवा जोपासण्याच्या उद्देशाने, तेच प्राचीन महत्त्व असलेले बारा खांबे मंदिर व खोलेश्वर मंदिर यांच्या जीर्णोद्धाराचा व या परिसराच्या विकासाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे सर्व स्तरातून धनंजय मुंडे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



पान १ वरून...

## लग्नातील हुंडा द्यायला सांग असे धमकावून विवाहितेच्या डोक्यात कोयत्याचा वार

आणि लाथाबुक्याने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली व फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला. डोक्यात गंभीर मार असल्याने फिर्यादीची ननंद सुनिता बाळू राठोड यांनी माजलगाव येथील खाजगी रुग्णालयात पुढील उपचारार्थ दोन दिवस दाखल केले. अशी फिर्याद सविता चव्हाण (माळतांडा तहत मोगरा ता. माजलगाव) हिने दिंद्रुड ठाण्यात दिली.

फिर्यादीच्या तक्रारीवरून पती रमेश नारायण चव्हाण याच्यावर गुरनं-१३१/२०२५ कलम ८५, ११५(२), ११८, ३५२, ३५१(२), ३५१ (३) भारतीय न्याय संहिता २०२३ सह कलम ४ हुन्डाबंदी अधिनियम १९६१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सपोनि अण्णाराव खोडेवाड यांचे आदेशाने सफौ नंदु वाघमारे करीत आहेत.

# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी; गट प्रवर्तक महिलांचा सन्मान

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.३१ वार शनिवार रोजी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर प्रमुख उपस्थिती म्हणून लिंबागणेशचे भुमिपुत्र नवनियुक्त पुरवठा निरीक्षक म्हणून बुलढाणा येथे कार्यरत असलेले प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी मानले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ.गणेश ढवळे यांनी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा जीवनपट उलगडताना मध्ययुगीन कालखंडात भारताच्या इतिहासात ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्यामध्ये



राजमाता जिजाऊ नंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय स्थान असुन धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कर्तृत्ववाने भारतभर त्यांनी मोठी किर्ती आणि नावलैकीक मिळवले.

संपुर्ण भारतभर मंदिरे बांधणे, मंदिरांचा जीर्णोद्धार, नद्यांवर घाट बांधणे, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे, धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालवणे आदी लोककल्याणकारी कार्याच्या खुणा आजही भारतभर दिसून येतात. २४ मार्च १७५४ मध्ये पती खंडेराव यांना सूरजला जाट बरोबर कुंभेरी येथे झालेल्या लढाईत वीर मरण आले. तो काळ सती प्रथेचा होता. त्या काळात खंडेरायांच्या सोबत सती जाण्याचे नाकारून अहिल्यामाईंनी आपल्या पुरोगामित्वाचा परिचय दिला होता. आता अहिल्यामाईंनी धर्म, प्रथा, रूढी, परंपरा या पलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानुन लोककल्याणासाठी जगण्याचा निर्धार केला. ज्या रूढी, प्रथा, परंपरा अंधाराकडुन प्रकाशाकडे नेतात त्याच आम्हाला मान्य आहेत अशी ठाम भूमिका घेतली. धार्मिक भावना जपत चुकीच्या पुढे परंपरांना छेद दिला. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यास विरोध करत धर्म चिकित्सेला प्रारंभ करणाऱ्या अहिल्यामाईंचे विचार आणि कृती क्रांतिकारक आणि प्रेरणादायी होती.

अहिल्यामाई होळकर यांनी महिला सशक्तीकरणावर विशेष भर दिला होता. विधवा स्त्रियांसाठी कायद्यात बदल केले. त्यांना मुल दत्तक घेण्याचा अधिकार, उदरनिर्वाहाकरीता पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिला. शिवाय दत्तक पत्रावर आकारला जाणारा नजराणा (कर) रद्द केला. स्त्रीसक्षमीकरणाच्या दृष्टीने ही पावले क्रांतीकारक होती असे प्रतिपादन केले. यावेळी राजेभाऊ गिरे, अनंतकाका मुळे, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, समीर शेख, अशोक जाधव, सुरेश निर्मळ, युवराज गिरे, रामचंद्र मुळे आदी उपस्थित होते.

**ग्रामपंचायतीच्या वतीने पुरवठा निरीक्षक पदी नियुक्त प्रथमेश गिरे व गट प्रवर्तक सिमा वखरे व ज्योती गिरे यांचा सन्मान**

लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची पुरवठा निरीक्षक पदी बुलढाणा येथे नियुक्ती झाल्याबद्दल शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गट प्रवर्तक सिमाताई वखरे व ज्योती गिरे यांचा ग्रामपंचायतच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सन्मान पत्र, रोख पाचशे रुपये आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.



# शहापूर मजरा येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय शहापूर मजरा येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यामध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेच पूजन उपसरपंच डिगांबर फरताडे यांच्या हस्ते यावेळी उपस्थित सरपंच प्रकाश आळणे, व्यंकटराव फारताडे, मोहनराव आळणे, भुजंग अवचार, भागवत लाळगे, शा.स. अध्यक्ष संतोष गाढवे, राणुजी धाईजे, प्रल्हाद आळणे, काशिनाथ शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

# अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त परमेश्वर सोळंके यांच्याकडून बीयाणे वाटप


गेवराई । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मौजे सादोळा येथील परमेश्वर सोळुंके हे गेल्या पाच वर्षांपासून अमरसिंह पंडित यांच्या वाढसानिमित अल्पभूधारक शेतकऱ्यांना बी-बियाणे वाटप करत असून आज गढी येथील अल्पभूधारक शेतकऱ्यांना बी- बीयाण्यांचे वाटप करण्यात आले.

माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सादोळा येथील परमेश्वर सोळुंके यांच्या वतीने श्रीपाद सोळंके, श्रीकिसन सोळुंके, सरपंच विष्णुपंत घोंगडे, उपसरपंच राजू पठाण, माजी सरपंच अंकुश गायकवाड, रामदास मुंडे, मंगेश कांबळे आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गढी येथील अल्पभूधारक शेतकऱ्यांना बी-बियाणांचे वाटप करण्यात आले. यावेळी आयोजकांकडून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाला श्रीचंद सिरसट, अमोल ससाणे, दिलीपराव नाकाडे, डॉ. चंद्रशेखर गवळी, अंकुश इंगळे, उद्धव नाकाडे आदींची उपस्थित होती. प्रातिनिधीक स्वरूपात पांडुरंग जाधव, लक्ष्मण मगर, ज्ञानेश्वर मोरे, अनिल मगर, शंकर इंगळे, गा मधुकर गायकवाड, महादेव नाकाडे, भारत जाधव, शहादेव शिरसाठ, गणेश गायकवाड, पद्माकर कुलकर्णी, गजानन गायकवाड आदींसह गढी येथील जवळपास १२५ शेतकऱ्यांना बी-बियाणांचे वाटप करण्यात आले. परमेश्वर सोळुंके हे गेल्या पाच वर्षांपासून अमररसिंह पंडित यांच्या वाढसानिमित अल्पभूधारक शेतकऱ्यांना बी-बियाणे वाटपाचा कार्यक्रम राबवत आहेत. यापूर्वी सादोळा, पुरुषोत्तमपुरी, सिरसदेवी, मंजरथ, लोणी शहाजानपुर आणि आज गढी येथे बी-बियाणे वाटपाचा कार्यक्रम घेतला आहे.



बीड : राष्ट्रमाता लोकमाता राजमाता मासाहेब अहिल्यामाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना प्राचार्य डी.जी. तांदळे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, अभिनेता डॉ. महेशकुमार वनवे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, रामधन जमाले, छाया सरवदे, राजु वंजारी आदी उपस्थित होते.

# अनिल जाधवर एक दिपस्तंभ : डॉ.विक्रम सारुक

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळा गांधीनगर कार्यरत असणारे अनिल जाधवर पदवीधर शिक्षक तथा राज्य अध्यक्ष कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ हे नियत वयोमानानुसार ३१ मे २०२५ अखेर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवा कार्याचा गौरव करण्यासाठी सेवागौरव सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २९ मे २०२५ रोजी हॉटेल निलकमल बीड येथे सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय पंचगल्ले शिक्षणाधिकारी (योजना) हे होते तर प्रमुख पाहुणे सुरेश केंद्रे लेखा व वित्ताधिकारी, ॲड सर्जेराव (तात्या) तांदळे जिल्हा सरचिटणीस भाजपा, दादासाहेब मुंडे कॉग्रेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, भगवान फुलारी शिक्षणाधिकारी प्राथमिक, डॉ.विक्रम सारुक प्राचार्य डायट, उपशिक्षणाधिकारी उध्दव सांगळे धाराशिव, भाऊसाहेब सानप प्राध्यापक एमबीए झील कॉलेज पुणे, समंदर खान गटशिक्षणाधिकारी बीड, जमीर शेख गटशिक्षणाधिकारी शिरुर (का), सिध्देश्वर माटे विस्तार अधिकारी, ॲड महेश गर्जे, डॉ.राजीव घुगे, डॉ.संध्याताई घुगे, डॉ.पी.सी.तांबडे, अनिलकुमार होळकर सिने प्रोडयुसर, मिनाक्षीताई होळकर पार्श्वगायिका, श्रीराम बहीर चेअरमन शिक्षक पतसंस्था बीड, विष्णू खेत्रे चेअरमन शिक्षक पतसंस्था गेवराई, मारुती पठाडे, चेअरमन शि.प.सं.आष्टी, दिलीप खाडे सचिव शि.प.सं.पाटोदा, सानप चेअरमन शि.प.सं. शिरुर (का), प्रशासन अधिकारी अनंता खेडकर, प्रवीण येवले, दैनिकाचे उपसंपादक नारायण नागरे नाना, नितिन क्षीरसागर, संघटनेचे नेते सुर्यकांत जोगदंड, नामदेव शिंदे, हरीदास घोगरे, सुरेश ढास, भगवान पवार, उनवणे सर, राजेंद्र लाड, सोन्याबापू शेंडगे इ.उपस्थित होते.

अनिल जाधवर पदवीधर शिक्षक पदावर जिल्हा परिषद शाळा गांधीनगर (मराठी) बीड केंद्र अशोक नगर तालुका बीड येथे कार्यरत



होते. ज्ञानादानासारख्या पवित्र अशा शिक्षण क्षेत्रामध्ये जाधवर यांची प्रदिर्घ अशी ३८ वर्षे सेवा घडली. सेवाकालवधीमध्ये कर्तव्य परायणता, तत्पुरता, शिस्त व निटनेटकेपणा संस्कार क्षम गुणवत्ता पूर्ण शिक्षण हे त्यांच्या सेवेचे वैशिष्टये होते. संघटनेच्या वतीने सेवागौरव सन्मानपत्र देऊन जाधवर यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. ज्ञानदानाचे कार्य करत असतानाच कास्ट्राईब संघटनेमध्ये २५ वर्ष एवढा कालावधी संघटनेच्या विविध पदावर राहून शिक्षक व कर्मचाऱ्यांना न्याय दिला. प्रशासनाला वेळोवेळी धारेवर धरले. प्रशासनाबरोबर कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. जिथे कमी तिथे आंम्ही हे सुभाषित जाधवर यांच्यासाठी निश्चित शोभते. निवृत्ती वेळी जाधवर हे कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या राज्यअध्यक्षपदी विराजमान असून आता ते राज्यस्तरावर व मंत्रालय पातळीवर शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे त्यांचे कार्य प्रशंसनीय असून ते एक प्रकारचे शिक्षकांसाठी दिपस्तंभाचे कार्य करतात असे विधान प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना प्राचार्य डॉ.विक्रम सारुक यांनी केले.

सेवाकालावधीमध्ये जाधवर यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्यामुळे त्यांना विविध पुरस्कार मिळाले. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषद बीडचा आदर्श शिक्षक पुरस्कार, मुलींची उत्कृष्ट पटनोंदणी जि.प.पुरस्कार, उत्कृष्ट कर्मचारी जनगणना कार्य भारत सरकारचा पुरस्कार याशिवाय अनेक पुरस्कार मिळाले. त्यामुळे त्यांच्या कार्याची व सेवेची दखल घेऊन कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ व केंद्रिय शाळा अशोकनगर यांच्या संयुक्त विद्यामाने सेवापूर्ती गौरव सोहळयाचे आयोजन केले. केंद्रप्रमुख हकीम मनियार, केंद्रीय मुख्याध्यापिका कमलताई लांडगे यांनी सत्कार आयोजनामध्ये सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊसाहेब हंगे यांनी केले सुत्रसंचालन प्रसिध्द सुत्रसंचालक महादेव इनकर यांनी केले. विशेषत: कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीततेसाठी परिश्रम घेतले. स्वागतगित व गितगायन सिने पार्श्वगायिका मिनाक्षीताई होळकर यांनी केले. सिने प्रोडयूसर अनिलकुमार होळकर यांनी समयोचित काव्य सादर केले. या कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, राजकीय नेते, डॉक्टर, वकील, पत्रकार बांधव, चुंब गावचे प्रतिष्ठित नागरीक, नातेवाईक, मित्रपरिवार मोठया संख्येने उपस्थित होते. समन्वयकाची भूमिका प्रकाश अहिरे व भगिरथ मस्के यांनी पार पाडली व सोमनाथ तांदळे, संजय दराडे, मच्छिंद्र राख, द.ल.वारे, बाळासाहेब सिरसाट यांनी मोलाचे सहकार्य केले तर आभार रविंद्र सुतार यांनी मानले.

## शब्दांचं पेरणं करत करत, खडू-फळ्यांतून चमकलेल्या स्वप्नांना मिळाली रुपेरी झळाळी

# शिक्षिकेची अभिनयात सुंदर उंची

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी अभिनय संपन्न आदर्श शिक्षिका तथा मराठी चित्रपट अभिनेत्री चंदा सारसेकर या आगामी 'अष्टपदी' चित्रपटात येत्या ३० मे २०२५ रोजी अष्टपदी हा त्यांचा मराठी चित्रपट आपल्या नजीकच्या चित्रपटगृहामध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटात चंदा सारसेकर यांची ही महत्वपूर्ण भूमिका आहे. महेंद्र पाटील यांच्या लेखणीतून उतरलेली ही कथा ९० च्या दशकातील म्युझिकल रोमान्स ची आठवण करून देणारी आहे.

त्यांनी या चित्रपटात शालिनी सरंजामेची ही भूमिका साकारली असून प्रेमात पडलेली त्यांची मुलगी व कडक शिस्तीचा नवरा या दोघांमध्ये होणारी भावानिक चकमक व त्या दोघांमुळे तिची होणारी घुसमट व त्यातून मुलीच्या प्रेमापोटी बदलनारा नवरा व त्यांनी घेतलेली त्यावेळेस घेतलेली भुमिका यात दाखवली आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या वर्गखोलीत शिकवणारी, चंदा सारसेकर रुपेरी पडद्यावर नक्कीच मोहवणारी ठरेल.

**शब्दांमधून ज्ञान देणारी, अभिनयातून भाव जिंकणारी!**

'अष्टपदी' चित्रपटातून आता नक्कीच महाराष्ट्रभर त्यांचे कौतुक होइल. तुमच्या या प्रवासाचा आम्हाला खूप अभिमान आहे, शाळेची आदर्श शिक्षिका, आणि रुपेरी पडद्यावरची सोज्वळ अभिनेत्री!, ज्याच्या बोलण्यात संस्कार, आणि अभिनयात संवेदना आहे, अश्या त्या चंदा सारसेकर. निर्माते उत्कर्ष जैन व दिग्दर्शक राष्ट्रीय पुरस्कार विजेते महेंद्र पाटील तथा सहदिग्दर्शक नंदू आचरेकर यांच्या दिग्दर्शनातून बनलेला 'अष्टपदी' या चित्रपटात येत्या ३० मे २०२५ रोजी त्या प्रेक्षकांसमोर झळकणार आहेत.

ज्ञान आणि कला यांची चालती-बोलती मूर्तीअसलेल्या चंदा सारसेकर

दिवसाच्या एका टोकाला मुलांना शिकवणारी, बाई तर दुसऱ्या टोकाला कॅमेऱ्यासमोर आत्मविश्वासाने उभी राहणारीअभिनेत्री. 'अष्टपदी' हा चित्रपट केवळ त्यांचा अभिनय नाही, तर ते त्यांच्यातले धैर्यही दाखवतोय! खरंच तूम्ही Extra ordinary आहात! गावाकडच्या शाळेत ज्ञानाचा दीप लावणारी, आणि मोठ्या पडद्यावर भावना व्यक्त करणारी... 'अष्टपदी' तुमचं स्वप्न नव्हे, तर आमच्या अभिमानाचं पान आहे. तुमचा संघर्ष तुमच्या अभिनयाइतकाच सुंदर आहे!



**एका साध्या शिक्षिकेपासून एक सशक्त अभिनेत्रीपर्यंतचा प्रवास...**

डोळ्यांतला आत्मविश्वास आणि चेहऱ्यावरचा तेज, शाळेतील बाई आणि पडद्यावरील स्टार! खरच! 'अष्टपदी' चित्रपटात झळकताना लाखोंना प्रेरणा देईल! 'अष्टपदी' चित्रपट हे केवळ तुमच्या कलेतलं स्थान नाही, तर तो आमचा मोठा अभिमान आहे! शिक्षण क्षेत्रात केवळ शिक्षक म्हणून न राहता चित्रपट, नृत्य, नाट्य या क्षेत्रासोबतच क्रीडा, तंत्रज्ञान याबरोबरच काळानुसार बदलणाऱ्या शिक्षणातील नवनवीन संकल्पनांचा आपल्या दैनंदिन अध्ययन अध्यापनात प्रभावी वापर करत आपला वर्ग, आपली शाळा, आणि या शाळेशी संबंधित असणारे सर्व पालक आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून शिक्षण क्षेत्रात अभिनयसंपन्न शिक्षिका म्हणून कार्यरत असणाऱ्या शिक्षिका चंदा सारसेकर अनंत या एक उत्तम सहशिक्षिका यासोबतच मराठी चित्रपट, नाट्य, मालिका सहाय्यक अभिनेत्री, लेखिका व ब्युटीशियन म्हणून सुपरिचित आहेत. स्वत: मराठी चित्रपट सहाय्यक अभिनेत्री असून त्या सध्या कार्यरत असलेल्या जि. प.प्राथमिक शाळा ताडसोन्ना ता. जि. बीड येथील त्यांच्या वर्गातील मुलांना आगामी मराठी चित्रपटात बालकलाकार म्हणून संधी उपलब्ध करून दिली. दीक्षा प व पीएम ई विद्या डीटीएच चॅनेलवर वरही त्यांचे अनेक शैक्षणिक व्हिडिओज प्रदर्शित करण्यात आलेले आहेत. याबरोबरच सारसेकर मॅडम यांनी लेखन क्षेत्रातही आपली लेखणी स्वच्छंदपणे चालवलेली आहे. त्यांनी आजपर्यंत स्वत: काही ११ पुस्तकाचे लेखन व प्रकाशन केलेले आहे. यासोबतच विविध राज्य व जिल्हा दैनिकातून विविध विषयावर आधारित वृतपत्र लेखन प्रकाशित झालेले आहे. शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासोबतच सांस्कृतिक आणि अभिनय क्षेत्रातील त्यांनी केलेल्या योगदानासाठी त्यांना अनेक राष्ट्रीय, राज्यस्तर, जिल्हास्तरावरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे..

उत्तम शिक्षकासोबतच त्या एक उत्तम अभिनेत्री देखील असून चित्रपट, नाट्य आणि मालिकाक्षेत्रात त्यांनी आपले वेगळेपण निर्माण केलेले आहे. सुधीर निकम यांची खोपा फिल्म त्यांची चित्रपटाची पहिली संधी ठरली. सन २०१७ पासून त्यांचा चित्रपटाचा प्रवास सुरू झाला. अभिनय क्षेत्रात त्यांनी आजपर्यंत एकूण ११ विविध चित्रपट, लघुचित्रपट, वेब सीरीज मध्ये अभिनय केलेला आहे.

येत्या ३० मे २०२५ रोजी अष्टपदी हा चित्रपट संपुर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे .चंदा सारसेकर यांचा प्रदर्शित होणारा हा ६ वा चित्रपट असून सर्वांनी हा चित्रपट पहावा असे आवाहन अभिनेत्री चंदा सारसेकर यांनी केले आहे. निर्माते उत्कर्ष जैन व दिग्दर्शक महेंद्र पाटील यांनी हा चित्रपट आपल्याला एक पर्वणीच ठरणार आहे असे म्हणले आहे.



# आगामी दीपावलीचा आकाश दिवा घरकूल लाभार्थ्यांच्या स्वत:च्या घरात लागावा : आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या घरकूल योजनेअंतर्गत सर्वसामान्य लाभार्थ्यांच्या स्वत:च्या नवीन घरात दिवाळी साजरी करून त्यांच्या जीवनात नवचैतन्य व भरभराटी व्हावी अशी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भावना असून त्यानुसार आगामी दीपावलीचा आकाश दिवा, आणि पणती घरकूल लाभार्थ्यांच्या स्वत:च्या घरात लागावा, असा मानस आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

आष्टी येथील भैरवनाथ मंगल कार्यालयात आयोजित ग्रामविकास व पंचायत राज विभाग जिल्हा परिषद बीड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांच्यावतीने येणारी दिवाळी नवीन घरकूलात या अभियानांतर्गत आष्टी, पाटोदा, शिरूर (कासार) या तीन ही तालुकास्तरीय कार्यशाळेत आमदार सुरेश धस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील, सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर, आष्टी गटविकास अधिकारी जी.व्ही. बागलाने, पाटोदा गटविकास अधिकारी वानखेडे, नलावडे, सभापती बद्रीनाथ जगताप, जेष्ठ नेते भाऊसाहेब भवर, विनायक जंजिरे आदी उपस्थित होते.




यावेळी बोलताना आमदार धस म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही अतिशय महत्त्वाची घरकुलाची योजना आहे. आपल्या मतदारसंघात जे अपूर्ण कामे आहेत ते लवकर लवकर पूर्ण करावेत. ग्रामरोजगार सेवकांनी सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवावी असे सक्त आदेश देऊन अधिकारी व ग्रामसेवक यांनी या घरकुल योजनेत होणाऱ्या पुरवणुकीत लक्ष देऊन स्वत: जबाबदारीने काम करावे यशवंत चव्हाण घरकुल योजनेत मतदार संघात २८ हजार घरकुले मंजूर आहेत. यामध्ये अनियमितता दिसून येत असल्याने बोगस मंजूर झालेल्या घरकुलाची चौकशी लावून पारदर्शकता आणू या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना माहिती देणार आहे. नवीन घरकुलाच्या सर्व्हेमध्ये देखील कोणताच लाभार्थी वंचित ठेऊ नका.

नवीन मंजूर असलेले प्रशासनाच्या माध्यमातून आपण सर्व घरकुले पुर्णत्वास घेऊन जाऊ. सर्वसामान्य हा घरकुलाचा लाभार्थी असतो त्यासोबत कंत्राटी कर्मचारी यांच्या वागणुकी बरोबर नाहीत. त्यांनी त्या येणाऱ्या काळात सुधाराव्यात अन्यथा मी वेगळा निर्णय कंत्राटी कर्मचाऱ्याबाबत घेईल असा इशारा दिला मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने साहेब यांचे देखील मी कौतुक करतो की त्यांनी पदभार स्वीकारताच प्रलंबित असलेले दहा हजार घरकुले मार्गी लावले. येणाऱ्या दिवाळीपर्यंत आपल्याला सर्वांना मिळून माझी माय माऊली नवीन घरकुलात आणायची आहे हे ध्येय ठेवून काम करायचे आहे, असे सांगत वैयक्तिक लाभांच्या योजनांचे हजेरी पत्रक तात्काळ भरावे आहे असे शेवटी सांगितले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने म्हणाले की, लोकप्रतिनिधी आम्हाला सहकार्य करत आहेत. बीड जिल्ह्यात १ लाखा पेक्षा जादा घरे मंजूर आहेत. फेब्रुवारी पासून ९५०० हजार घरकुले पुर्णत्वास नेले आहे. आणखी ५० हजार घरकुले येणाऱ्या दिवाळी पर्यत पूर्ण करायचे आहेत. या पार्श्वभूमीवर आजची ही जिल्ह्यातील पहिली कार्यशाळा आपण आयोजित केली आहे. या दिवाळीपर्यंत येणाऱ्या दिवाळीपर्यंत जो लाभार्थी घरकुलाचे अतिशय उत्कृष्ट असे काम करेल त्या लाभार्थ्याच्या घरी आमदार सुरेश धस व मी स्वत: फराळासाठी येईल. आपण जी आज प्रतिज्ञा घेतली आहे. त्या प्रतिज्ञाप्रमाणे लाभार्थी यांनी घरकुलाचे काम दिवाळी पर्यंत पूर्ण पूर्णत्वास न्यावेत व ही येणारी दिवाळी नवीन घरात व्हावी अशी भावना जीवने यांनी यावेळी शेवटी बोलताना व्यक्त केली. यावेळी प्रकल्प संचालक संगीता पाटील म्हणाल्या, पहिली कार्यशाळा आष्टी तालुक्यात घेण्याचा मान मिळाला आहे. चांगली व दर्जेदार घरकुले बांधा, दिशा पाहून घरकुले बांधा. आपण सगळे मिळून दिवाळीचा पहिला दिवा लाभार्थी यांच्या नवीन घरात लावायचा आहे.

यावेळी आयोजित कार्यशाळेत मतदारसंघातील सरपंचांच्या समस्या जाणून घेत येणाऱ्या काळात सोडविण्ययाचे आश्वासन आ.धस यांनी दिले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकरसर यांनी केले तर आभार पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बाळासाहेब जायभाये यांनी मानले. यावेळी मतदार संघातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, घरकुल विभाग अधिकारी व कर्मचारी, नरेगा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेसह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड शहरातील उच्चभ्रू वस्ती इंडिया बँक कॉलनी येथे छापा

## एक आंटी व एक दलाल अटकेत, परराज्यातील एका महिलेची सुटका

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जालना रोडवरील इंडिया बँक कॉलनी येथे एका आपार्टमेंट मध्ये एक महिला व एक पुरुष परराज्यातील महिला आणून तिचे कडुन वेश्या व्यवसाय करून घेतात, अशी गोपनीय माहिती AHTU पथक प्रमुख API वर्षा व्हगाडे यांना मिळाली होती. त्यावरून सदर भागामधील राम अंश अपार्टमेंट मध्ये फ्लॅट-०२ मध्ये AHTU पथक बीड यांनी डमी ग्राहक व दोन पंचांसह सापळा रचून रेड केली असता, सदर ठिकाणी पश्चिम बंगाल येथील मुर्शिदाबाद, कोलकत्ता येथील एक पिडीत महिला हीचेकडून आँटी शकुंतला सुरेश राऊत वय ४० वर्ष राहणार फ्लॅट क्रमांक ०२ राम अंश अपार्टमेंट इंडिया बँक कॉलनी बीड, ही दलाल महेश मोहनराव चांदणे वय ३३, राहणार गया नगर बीड, याचे व मुमताज नासिर शेख गेवराई हीचे मदतीने स्वत:चे भाड्याने घेतलेल्या फ्लॅटमध्ये वेश्या व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. सदर कामास मुमताज नसीर शेख, कामासाठी महिला पुरवत असे, व दलाल महेश चांदणे हा त्याचे रिक्षा क्रमांक MH- 23 -R 0509 यातून मुलींची ने आण करून शकुंतला राऊत हिच्याकडे महिला पुरवत असे.



याप्रकरणी या तिघांवरही अनैतिक मानवी प्रतिबंध कायदा कलम ०३,०४,०५,०६ या अन्वये व भारतीय न्याय संहिता कलम १४३ (२) अन्वये पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून आँटी शकुंतला राऊत व आरोपी महेश चांदणे यास अटक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणातील आरोपी क्रमांक ०१ व ०२ हे दोन्ही आरोपी सराईत असून यापूर्वी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे २०२१ व २०२२ मध्ये पिटा कायद्यांतर्गत तसेच खझउ ३२४,४२७,१३८ अन्वये गुन्हे दाखल आहेत.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास गात, AHTU पथक प्रमुख API वर्षा व्हगाडे, पुरुष अंमलदार ASI ७८३ संजय सुरवसे, पोह/२४२ अशोक शिंदे, पोह २१५७ प्रदीप येवले, महिला हवालदार १२७३ अनिता माने, पोह १३४७ मनीषा खरमाटे यांनी केली.

# सापडले खोट्या वादात आ.धनंजय मुंडे मन:शांतीच्या शोधात विपश्यना केंद्रात

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे हे विविध वादामध्ये अडकले असून संतोष देशमुख हत्या आणि करुणा मुंडे प्रकरणातील आरोपानंतर त्याने मंत्रिपदाचा राजीनामा दिला. संघर्षातून बाहेर पडण्यासाठी ते नाशिकच्या इगतपुरी येथील विपश्यना केंद्रात १० दिवसाच्या साधनेसाठी दाखल झाले आहेत.



तथागत भगवान गौतम बुद्धाने सांगितल्या प्रमाणे इगतपुरी नाशिक येथे मन: शांती, साधना, विपश्यना केंद्रात दाखल झाले आहेत.

या नंतर धनंजय मुंडे यांनी आरोग्यसाठी लक्ष देण्याचा निर्णय घेतला. धनंजय मुंडे याच्या दोन्ही डोळ्यावर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर काही दिवसातच त्यांनी सलग १० दिवस त्याचा कार्यक्रम असल्याचे समजते त्यापैकी ९ दिवस पुर्ण झाले असून ते आपली ध्यान साधना पुर्ण करुनञ ते २ तारखेला पुन्हा कामाला लागणार असल्याचे त्याच्या कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# दणदणाट करणाऱ्या डीजेवर दंडात्मक कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलिसांनी मोठ्या आवाजात स्पीकर लाऊन दणदणाट करणाऱ्या ऊा वर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

बीड शहर पोलिसांना माहिती मिळाली होती की, एक ऊा सावता माळी चौक जवळ लग्नात ऊा द्वारे मोठमोठाने गाणे वाजवत आहे. त्यामुळे तेथील भागात राहणाऱ्या नागरीकांना प्रचंड त्रास होत होता. तसेच रहदारी अडून धरल्याने लोक त्रस्त झाले होते. या ऊा ला जागेवरून ताब्यात घेण्यात आले. त्याबाबत ठढज ला लेखी माहिती देण्यात आली. ठढज यांनी परीक्षण करून ऊा वाहन क्रमांक चक२० -ढ २२२९, मालक शेख सय्यद शेख वाजेद, राहणार खरसुंडी तालुका जिल्हा बीड, यांना ६९०००/- रुपये दंड आकारण्यात आला आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक श्री सचिन पांडकर, यांचे सूचना प्रमाणे पोलिस निरीक्षक श्री.शीतलकुमार बल्लाळ, सपोनी श्री. बाबा राठोड, पोलीस नाईक जायभाय, पोलीस हवालदार गरजे, पोलीस हवालदार शौकत, पोलीस शिपाई मनोज परजणे यांनी कारवाई केली आहे.






अवकाळी पावसाने तागडखे येथील शेतकरी सतीश भाऊ जपकर यांच्या सात ते आठ एकर केळीची बाग या बागेचे मोठ्या प्रमाणात अवकाळी पावसाने नुकसान झाले आहे. तोंडाशी आलेला घास अवकाळी पाऊस घेतला हिरावून घेतला आहे त्याचेही घेतलेले छायाचित्र. (छायाचित्र शौकत पठाण)

# आ. संजय केळेकर यांचा किल्ले धारूरमध्ये सत्कार

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर येथे दि ३० मे रोजी शुक्रवार भारतीय जनता पार्टी चे ठाणे शहराचे जनसेवक आमदार संजय केळेकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०० व्या जयंती निमित औंढा नागनाथ, माहूरगड रेणुका देवी दत्त शिखर व अनुसया देवी, शनिदेवाचे शक्तिपीठ राक्षस भुवन, परळी वैजनाथ मंदिर, अंबाजोगाई मंदिर व किल्ले धारूर येथील अंबाचोंडी देवी मंदिर व सिताची नहानी येथे दर्शन घेतले तसेच किल्ले धारूर शहरातील ऐतिहासिक किल्ला या ठिकानी पहाणी केली.



या वेळी किल्ले धारूर येथे आल्या निमित आमदार संजय केळेकर यांचा सत्कार करताना नगर परिषद चे मुख्याधिकारी श्री महेश गायकवाड, विकास पाटील सदस्य परिवहन समिती ठाणे महानगरपालिका, भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष एडवोकेट मोहन भोसले, शंकर देवा पुजारी व सर्व मान्यवर उपस्थित होते.

# २३ जुलै १९८९ सारखी बीडमध्ये महापुराची दुर्घटना घडली तर नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन जबाबदार

## विभागीय आयुक्तांनी २ वेळा मुख्याधिकारी यांना बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमण प्रकरणी ठोस कारवाईचे आदेश देऊनही जाणिवपूर्वक दुर्लक्ष



बीड । प्रतिनिधी

यावर्षी मान्सुनपुर्व झालेल्या अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण पुर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले आहे. येत्या पावसाळ्यात पावसाची आवक वाढल्यानंतर बिंदुसरा नदीला पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असुन दि.२३ जुलै १९८९ सारखा बिंदुसरा नदीला महापुर येऊन ३५ वर्षांपूर्वी घडलेली दुर्दैवी घटना घडु शकते. नदीकाठच्या वस्तिंना मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली होती. गेल्या ३ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, युनुस शेख, सुदाम तांदळे यांनी वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाचा याला छुपा पाठिंबा असुन नदीपात्रात कचऱ्यांचे ढीग, भर घालुन त्यावर प्लाटींग करणे, रस्ते बनविणे, बांधकाम करणे असे सर्रास प्रकार आढळून आले.

संबंधित प्रकरणात विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार केल्यानंतर त्याअनुषंगाने सहाय्यक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद डॉ.निलम पाटील यांनी दि.२९ मे आणि दि.२८ जुन २०२३ अशा २ वेळा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड निता अंधारे यांना बिंदुसरा नदीपात्रात भराव घालून नदीपात्राचे मैदान करून ओढे चक्क बुजवुन नदीचा प्रवाह वळवुन करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकाम प्रकरणी ठोस कारवाई करण्याचे आदेश देऊनही मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांनी आणि जिल्हा प्रशासनाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे भविष्यात जर बिंदुसरा नदीला आलेल्या पुरामुळे जिवितहानी अथवा वित्तहानी झाली तर याला सर्वस्वी नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हा प्रशासन जबाबदार असणार आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात फौजदारी कारवाई आणि नुकसान भरपाई जबाबदार अधिकाऱ्यांकडून घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि रामनाथ खोड यांनी केली आहे.

**पुराचा धोका ओळखून उपाययोजना करण्यापेक्षा भुमाफियांची तळी उचलण्यात नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासनाने धन्यता मानली : डॉ.गणेश ढवळे**

१९८९ चा बिंदुसरा नदीला आलेला पुराचा मागील अनुभव पाहता नगरपरिषद प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभाग यांना वारंवार पुर नियंत्रण रेषा (निल रेषा, लाल रेषा) आखणी करण्यात यावी. संरक्षक भिंतीचा अभाव, नदीपात्रात व शेजारी अनेक अतिक्रमित ईमारतीची बांधकामे करण्यात आलेली आहेत. तर फुलाई नगर मधील बिंदुसरा नदीपात्रात सिमेंटची भिंत बांधून नदीचा प्रवाह वळविण्यात आलेला आहे आणि संबंधित प्रकरणात वारंवार तक्रारी व आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषद व जिल्हा प्रशासन आपापले स्वार्थ साधून भुमाफियांशी संधान बांधून आहेत. त्यामुळे आज बीडकरांचा जीव टांगणीला लागलेला असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

# न्यायाचार्य श्री नामदेव महाराज शास्त्री लिखित 'ज्ञानेश्वरी भावानुवाद अध्याय दुसरा' 'ई-बुक'चे लोकार्पण

भगवानगड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी वारकरी सांप्रदायाला दिशादर्शक असणारे संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथ भावानुवाद लिखाणाचे महत्वपूर्ण काम हाती घेतलेले आहे. त्यापैकी दुसऱ्या अध्यायाच्या भावानुवाद ई-बुक ग्रंथाचे आज श्री क्षेत्र भगवानगड येथून लोकार्पण झाले आहे. न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्रीजी हे पारंपरिक वारकरी संप्रदायातील प्रवचनकार व कीर्तनकार असून त्यांचे सुरुवातीचे शिक्षण आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेत झाले. त्यानंतर संस्कृत साहित्यात सर्वात कठीण असणाऱ्या न्यायशास्त्राचं शिक्षण श्रीगुरू श्री १००८ स्वामी




काशिकानन्दगिरीजी महाराज द्वादश दर्शनाचार्य आनंदवन आश्रम कांदिवली मुंबई येथे गुरुकुल पद्धतीने ९ वर्षे शिक्षण घेऊन वाराणशी विद्यापिठाची 'न्यायाचार्य' ही पदवी संपादन केली. तसेच पुणे विद्यापीठातुन एम ए(मराठी) करून 'वारकरी संतांची कुटरचना' या विषयावर मराठवाडा विद्यापीठातून पि एच् डी संपादन केली.

श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी वै.गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर १० नोव्हेंबर २००३ पासून श्री क्षेत्र भगवानगडाच्या गादीचे उत्तराधिकारी म्हणून ते भगवानगडाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांचे ज्ञानेश्वरी व संस्कृतचे अध्ययन-अध्यापन चालू आहे. पारंपरिक व आधुनिक दोन्ही अभ्यास असणारे असे हे वक्ते आहेत. त्यांचे किर्तन व प्रवचन ज्ञानेश्वरी अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त असून यात मानसिक समस्येचे समाधान आहे.

वै.श्री संत भगवानबाबांचा वारसा पुढे चालू ठेवत त्यांनी गडावरील मंदिराचा मोठा विकास केला आहे. आळंदी, पंढरपूर, पैठण व छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी भगवानगडाचे मोठे मठ त्यांनी ऊभारले आहेत. तसेच श्री क्षेत्र भगवानगड येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे भव्य दगडी मंदिर उभारण्यात येत असुन वारकरी शिक्षण देणारे ज्ञानेश्वरी विद्यापीठ २००४ साली स्थापन करून वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार करण्याचे काम सुरू आहे. भाविकांना कीर्तन व प्रवचन ऐकण्यासाठी त्यांचे नामदेव शास्त्री ऑफिशियल व आनंदाचे सिद्धांत हे दोन चॅनेल समाज माध्यमांवर उपलब्ध आहेत. श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा लिखित ज्ञानेश्वरी भावानुवाद अध्याय पहिला व दुसरा या दोन्ही अध्यायांची पीडीएफ फाईल आपल्या मोबाईलवर हवी असल्यास ९७६४९३१००८ या नंबरवर संपर्क करावा.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT